# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २४/१/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२०) इतिवृत्त**

**बुधवार** दिनांक **२४ जानेवारी २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी १२.२० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
5. श्री. मुजीब आलमशाह खान
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. सावंत मधुकर दामोधर
13. श्री. मो. जावेद मो. इसाक
14. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : सर्व अधिकारी आजरिसर्च सेंन्टर येथे महत्वाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित आहे. विनंती की आजच्या सभेत विषय पत्रिकेवर बोलावे.तो कार्यक्रम महत्वाचा असून सभा संपल्या नंतर सर्व सदस्यानी त्या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

श्री.मधुकर सावंत : दारीद्रय रेषेखालील सर्वे संदर्भात चर्चा करायची होती. आपला कार्यकाळ संपत आलेला आहे. नेहमी पुढील बैठकील खुलासा करू असे म्हटले जते. सभागृहाला माहिति मिळत नाही.

मा. सभापती : पुढील बैठकीत हा विषय चर्चेला घेतला जईल.

श्री.त्र्यंबक तुपे : मागच्या बैठकीतील अनेक प्रश्नावर या बैठकीत माहिती देणार होते.

**<u>विषय क्र.212 :</u>**

दिनांक **16/12/2006** (का.प.क्र.17) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : पान क्र. ६ वर पेट्रोल पंप तसेच मोबाईल टॉवर्स संबंधी माहिती देणार होते अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. खुलासा करावा.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : सहा. संचालक नगररचना तसेच उपआयुक्त(महसूल) यांचे संदर्भात विषय आहे. अनधिकृत टॉवर्स संदर्भात आजची परीस्थिती काय आहे याची माहिती सहा. संचालक नगर रचना हे देतील.

श्री.त्र्यंबक तुपे : शहरात एकूण पेट्रोल पंप किती, कितीना एनओसी दिलेली आहे. महापालिकेच्या एनओसी शिवाय किती पेट्रोल पंप चालू आहेत, त्याचप्रमाणे मोबाईल टॉवर्सच्या बाबतीतही. तसेच अग्निशमन विभागाची एनओसी घेतली नसलेले पेट्रोल पंप किती आहेत.

सहा. संचालक(न.र.): ९ पेट्रोल पंप धारकांना एनओसी दिलेली आहे. शहरात किती पेट्रोल पंप आहे याचा सर्वे प्रशासकीय विभागाकडून होणे गरजेचे आहे. सन २००३ पासून एनओसी ज्यांना दिली आहे त्याची यादी या विभागाकडे आहे.

श्री. त्र्यंबक तुपे : ज्यांनी एनओसी घेतली नाही ते पेट्रोलपंप का बंद केले नाही. ते चालू आहेत. यामुळे शहरातील नागरीकांच्या जीवीतास धोका होवू शकतो.

मा. आयुक्त : शहरात किती पेट्रोल पंप आहे याची माहिती त्यांचेकडे नाही परंतू ज्यांना एनओसी दिलेली आहे त्याची माहिती त्यांचेकडे आहे. एनओसी न दिलेले व चालू असलेले किती पेट्रोल पंप आहे याचा सर्वे करावा लागेल. किती पेट्रोल पंप धारकांनी दोन्ही विभागाची एनओसी घेतलेली आहे हे तपासावे लागेल. सर्वे करण्याची जबाबदारी नगररचना विभागाची नाही. १०० टक्के सर्वे करण्यासाठी वार्ड अधिकारी यांचेकडे काम सोपविले जईल. सात दिवसात वॉर्ड अधिकारी याची माहिती देतील. त्यातून कितीनी एनओसी घेतलेली आहे हे कळेल व त्याची माहिती सहा.संचालक नगर रचना तसेच अग्निशमन विभागास द्यावी लागेल.

श्री.दिलीप गायकवाड: मागिल वेळेस मी मुद्दा उपस्थित केला होता की एमआयटी कॉलेजच्या समोर एक मोबाईल टॉवर्सचे काम चालू आहे त्यास एनओसी दिलेली आहे काय, याचा खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : शहरात किती पेट्रोलपंप आहे. एनओसी घेतलेले किती न घेतलेले किती धोकादायक किती या सर्वांची माहिती सात दिवसात मिळावी. तसेच मोबाईल टावर्सच्या संदर्भातही सात दिवसात माहिती मागवून घ्यावी.

मा. सभापती : शहरात किती पेट्रोल पंप आहेत, एनओसी किती कडे आहे. अग्निशमन विभागाची एनओसी कितींनी घेतलेली आहे याची वॉर्ड अधिकारी यांनी सात दिवसात माहिती द्यावी.

मा. आयुक्त : किती पेट्रोल पंप, मोबाईल टॉवर्स किती आहे. कितींनी एनओसी घेतलेली आहे, एनओसी न घेतलेले किती यासंबंधी सात दिवसात सर्व माहिती दिली जईल. कोणते धोकादायक आहे या बाबतीत अग्निशमन विभागामार्फत चौकशी करावी लागेल. त्यासाठी वेळ लागेल.

श्री.मुजेब खान : पान क्र ९ वर संत एकनाथ रंग मंदीरसाठी होणारा खर्च या बाबतीत चर्चा झालेली होती. योग्य खुलासा प्रशासनाकडून मिळाला नव्हता. पत्र देवून माहिती घेतली असता ३०.८४ लक्ष तसेच त्यानंतर २५.५० लक्ष दिलेला आहे. असे एकूण ५६.३४ लक्ष खर्च होत आहे. अशी प्रशासनाकडील माहिती आहे. पाच वर्षात किती खर्च झाला व किती उत्पन्न मिळाले याची माहिती विचारलेली होती. सन २००१-०२ यावर्षात ११.४१ लक्ष सन २००२-०३ मध्ये १४.११ लक्ष तर २००३-०४ मध्ये १०.४१ लक्ष सन २००४-०५ मध्ये ८.१५ लक्ष सन २००५-०६ मध्ये ९.९६ असे पाच वर्षाचे उत्पन्न ५३.४४ लक्ष होते. एकूण पाच वर्षात झालेला खर्च किती माहिती विचारली असता दोन तीन बाबीचा खूलासा केलेला असून बांधकाम, कलर खर्चाची माहिती दिली नाही, लाईटची माहिती दिली. अंदाजे एक वर्षासाठी १६.४७ लक्ष खर्च दाखवित आहे. पाच वर्षात ८३.०६ लक्ष होतात. बाकी इतर बाबीवर जे खर्च होत आहे त्याची माहिती दिली नाही. त्यासह एकूण १.५० ते २.०० कोटीपर्यंत खर्च होत आहे. उत्पन्न ५६ लक्ष होत आहे. पाच वर्षात दीड कोटीचे नुकसान होत आहे. लाईट व कर्मचाऱ्यांवरील खर्च दिला नाही. मागिल वर्षी केलेले काम व या वर्षी होत असेलेले काम हे वेगवेगळे आहे काय त्याची प्रत्यक्ष प्रशासनाने पाहणी केलेली आहे काय? माझ्या माहिती प्रमाणे मागिल वर्षी व या वर्षी एकच काम करीत आहे. दुसऱ्यांदा खर्च होत आहे. जेकाम पूर्वी केले होते तेच काम याही वर्षी होत आहे. याची चौकशी झाली पाहिजे

मा.सभापती : सभा संपल्यानंतर मी स्वत: संबधीत कार्य. अभियंता तसेच स. सदस्य श्री. मुजेब खान आपण प्रत्यक्ष जगेवर जवून पाहणी करू.

मा. आयुक्त : पुर्वी काय काम केले होते याची लिस्ट घेवू व या वर्षी काय काम केले जत आहे याची पाहणी केली जईल. दोन्ही टॅली करून कार्यवाही करता येईल.

श्री.मधुकर सावंत : जे काम झालेच नाही त्याचे बिल दाखवून देण्यात आले. रंगरगोटी शिवाय दुसरे कोणतेही काम झाले नाही.

श्री.मुजेब खान : लाईटचे १२ लक्ष चे कोणकोणते काम करीत आहे.

श्री. मधुकर सावंत : विभागीय आयुक्तामार्फत चौकशी करण्यात यावी. नसता जेजेकाम केलेले आहे त्या सर्व संचिका पाहणी करते वेळेस सोबत घ्याव्यात. काम झाल्याचे दाखवावे.

मा.सभापती :अशी परीस्थिती असेल तर स्वत: आपण सर्वजण पाहणी करू. मा.आयुक्त तसेच मी स्वत: तेथे उपस्थित राहील. जेदोषी असतील त्यांचेवर कार्यवाही केली जईल.

श्री.मुजेब खान : पान नं. २२ वर रविंद्रनगर भागात महापालिकेच्या मालकीचा हॉल असून तेथे अतिक्रमण केलेले आहे अनेक वेळा प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

मा. सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी सभा संपल्यानंतर रविंद्रनगर येथील हॉलची पाहणी करावी व नियमानुसार कार्यवाही करून अहवाल माझ्याकडे सादर करावा. त्याची एक प्रत स.सदस्य श्री. मुजेब खान यांनाही देण्यात यावी.

सौ. लता दलाल : मागिल बैठकीत मी रस्त्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित केलेला होता त्या चर्चेचा यात समावेश दिसून येत नाही. रस्त्याच्या संदर्भात जेप्रस्ताव येतील त्याची माहिती सभागृहात सात दिवसाच्या आत देण्याचे आदेशीत केले होते व या पुढे असे प्रस्ताव

येतील त्यावेळी त्याची माहिती सोबत असावी असे निर्देश दिले होते. असे असतांना आजच्या विषयपत्रिके सोबत नुसते विषय दिलेले आहेत. मागिल प्रस्तावाच्या संबधी माहिती अगोदर देण्यात यावी. त्यानंतर हे प्रस्ताव घेण्यात यावे. दुसरा मुद्दा असा की, मी पत्र देवून माहिती विचारली होती की जपानला जण्यापूर्वी मा.आयुक्त यांनी जे निलंबीत कर्मचारी होते त्यांना कामावर घेण्यात आले होते. का घेतले असेल हा विषय स्थायी समितीच्या अखत्यारीत होता स्थायी समिति समोर आलेला नव्हता असे असतांना कशाच्या अधारे घेण्यात आले खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : ज्या वेळेस प्रस्तावा संबधी माहिती देण्याबाबत चर्चा झालेली होती त्या अगोदर या विभागातून हे प्रस्ताव पाठविण्यात आलेले होते त्यामुळे प्रस्तावासोबत माहिती दिलेली नाही. यापुढे जे रस्त्याचे प्रस्ताव सादर केले जतील त्यावेळी प्रस्तावासोबत माहिती दिली जईल. या विषयासह दोन दिवसात माहिती मा. सभापती यांचेकडे सादर करण्यात येईल.

मा. सभापती : दोन दिवसात मागिल बैठकीतील विषय व या बैठकीतील सर्व विषया संबधीची माहिती दोन दिवसात माझेकडे संबधीत अधिकारी यांनी सादर करावी. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मज़ूंरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **16/12/2006** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.213 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जालाननगर भागातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,36,000/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता दोन निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | ए. सी. कोठारी | अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त दराने |
| 2 | डी. अजितसिंग | अं.प.दरापेक्षा 11% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री.ए.सी.कोठारी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त आहेत. तरी श्री.ए.सी.कोठारी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. मधुकर सावंत : विषय क्र २१३ ते २२४ पर्यंतचे सर्व विषय डांबरीकरणाचे असून जस्त दराचे आलेले आहत. याचा खुलासा करावा.

श्री.मो.जवेद मो. इसाक: सर्वांनी विभागून काम घेतलेले आहे. हे सर्व प्रस्ताव रिकॉल करावे.

अति.शहर अभियंता : २१३ ते २१९ पर्यंतचे सर्व डांबरीकरणाचे प्रस्ताव आलेले आहे. सर्व अंदाजपत्रक २००४-०५ या वर्षाच्या डीएसआर प्रमाणे तयार केलेली असून त्यावेळी डांबराचा भाव १३,८०० प्रति मेट्रीक टन इतका होता आज रोजेचा बाजर भाव रू.२७,५२१ प्रति मेट्रीक टन असा आहे. यामध्ये इतकी मोठी तफावत झालेली आहे. मुळात जे टेंडर

आलेले आहे ते २५ ते ३० टक्केनी जस्तीचे आलेले आहे. प्रशासनाने यात प्रत्येक ॲटमचे बाबत तपासणी करून जे दर येतो तो प्रस्तावित केलेला आहे.

श्री. मधुकर सावंत : अनेक टेंडरच्या बाबतीत एक किंवा दोन टेंडर येणे किंवा जस्त दराचे येणे असे टेंडर मा. आयुक्त यांनी अनेक वेळा रिकॉल केलेले आहे. या प्रस्तावाच्या बाबतीत का केले नाही.

मा. आयुक्त : टेंडर येते तेव्हा किती लोकांनी भरले कसे भरले या बाबतीत प्रशासनास थोडासा अंदाज येतो. याचा अर्थ असा नाही की प्रत्येक टेंडर मध्ये रिंग होते व रिकॉल करणे ही आयुक्तांचीच जबाबदारी नाही. तर यात १०० टक्के रिंग झाली असे सभागृहाला वाटत असेल तर रिकॉल करावे. जेप्रशासनाला योग्य वाटले नाही ते रिकॉल केले.

श्री.रविकांत गवळी : शहरातील विकास कामे होणे गरजेचे आहे. सभागृहात हे प्रस्ताव येवू द्यायचे की नाही या बाबतीत प्रशासनानेच अगोदर निर्णय घेणे आवश्यक होते. आता रिकॉल केले तर स्थायी समितीच विकास कामाचे प्रस्ताव मंजूर करीत नाही असा संदेश जनतेसमोर जईल. जनेवारी महिना चालू आहे विकास कामे होत नाही. त्यासाठी प्रस्ताव सभागृहात येण्यापूर्वी ही पॉलीसी ठरविली पाहिजे

श्री. त्र्यंबक तुपे : ८ ते १० महिन्याचा कार्यकाळ गेला, कोणत्याही वार्डात विकास कामे सूरू झालेली नाही. रिकॉल करण्यापेक्षा मा. आयुक्तांनी वाटाघाटी कराव्यात व कामास सुरूवात करावी. रिकॉल केले तर पुढील बजेट मध्ये स्पील ओव्हर म्हणून ती कामे जतील. पुढील वर्षातील कामे होणार नाही असे वाटते.

मा. आयुक्त : सभागृहाच्या माहितीसाठी खुलासा करतो की २० टेंडर जतात, दोनच येतात. एक एजन्सीने कागदपत्र दाखल केले नाही म्हणून एक टेंडर उघडणार नाही. असा प्रकार जस्त होत असल्यामुळे रिकॉल करण्याची वेळ आली. आता रिकॉल करण्याची गरजभासणार नाही. किती टक्के कमी अथवा जस्त मध्ये फरक येतो, वाटाघाटी करण्याइतपत आल्यास तशी कार्यवाही केली जते.

श्री.त्र्यंबक तुपे : वर्ष संपत आले आता रिकॉल केले जते. वार्डात कोणतेही विकास काम होत नाही.

श्री.मुजीब खान : विकास कामाच्या संचिका दोन तीन महिन्यापूर्वी मंजूर होणे अपेक्षीत होते. त्याच कामाच्या संचिका येण्यास आता सुरूवात झालेली आहे. मुख्य कार्यालयात वार्ड कार्यालयाकडून संचिका येतात तर परत केल्या जतात. रोषणगेट रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहे. तसेच लहान रस्त्यावरही मोठमोठे खड्डे पडलेले आहे. त्याच कामाच्या संचिका परत केल्या जतात असे होत असेल तर विकास कामे केव्हा करणार आहात. दीड वर्षापासून विकास कामे होत नाही. ज्या संचिका येतात त्या परत केल्या जतात. विकास कामे होणार की नाही खुलासा करावा.

श्री.मो.जवेद मो. इसाक: आलमगीर उर्दू वृत्तपत्र आहे. त्यात एक बातमी आली की चंपा चौक पासूनचा जे रस्ता आहे तो रस्ता चांगला नसल्यामुळे एका महिलेची डिलेवरी रिक्षामध्येच झाली. यावरून तो रस्ता कसा असेल याचा विचार करावा.

श्री.मुजीब खान : गरीब घरातील एक शिक्षिका शाळेवर कार्यरत होवून दोनच महिने झाले होते. सदर शिक्षिकेचा रस्त्यावरील खड्ड्यामु ट्रकच्या धडकेने मृत्यू झाला. या बाबतीत प्रशासनासही कळविले होते, कार्यवाही केली नाही.

मा.सभापती : या रस्त्याच्या संदर्भात संबधीत अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करावे व तातडीने काम होणेच्या दृष्टीने कार्यवाही करावी.विषय क्र **२१३ ते २२५** पर्यत मंजूर करण्यात येत आहे.

श्री.मो.जवेद मो. इसाक: रस्त्याचे काम होण्यास वेळ लागत असेल तर पॅचवर्क करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालाननगर भागातील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.98% जास्त दराची श्री. ए.सी.कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.214 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर अंतर्गत जालाननगर येथील 12 मी.रूंद रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,97,000/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 10 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | राजेंद्रसिंग डी.अजितसिंग | अं.प.दरापेक्षा 21.60% जास्त दराने |
| 2 | के. बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा 28.21% जास्त दराने |
| 3 | अरोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 30% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 21.60% जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 13.11% जास्त दर येतात.

तरी श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.11% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.94 बन्सीलालनगर अंतर्गत जालाननगर येथील 12 मी.रूंद रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.11% जास्त दराची श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.215 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सुतगिरणी चौक ते काबरानगर या 12 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,21,100/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 9 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 1 निविदापत्रक दर भरून प्राप्त झाले. प्राप्त निविदापत्रक उघडण्यात आले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) | श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग | अं.प.दरापेक्षा 11% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रका पैकी श्री.डी.अजितसिंग यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त आहेत. तरी श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी चौक ते काबरानगर या 12 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री.राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांनी अं.प.दरापेक्षा 11% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.216 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 एन-1 सेक्टर अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,99,130/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 26.26% जास्त दराने |
| 2 | के. बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा 28.21% जास्त दराने |
| 3 | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 30.22% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री. ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 26.26% जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 12.75% जास्त दर येतात.

तरी श्री. ए.एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.75% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 एन-1 सेक्टर अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.75% जास्त दराची श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.217 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.95 पदमपुरा अंतर्गत 12 मी. रूंद रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,98,300/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 9 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 26.26% जास्त दराने |
| 2 | के. बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा 28.21% जास्त दराने |
| 3 | जसमितसिंग सलुजा | अं.प.दरापेक्षा 30% जास्त दराने |
| 4 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 31.22% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री. ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 26.26% जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 13.22% जास्त दर येतात.

तरी श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.22% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.95 पदमपुरा अंतर्गत 12 मी. रूंद रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.22% जास्त दराची श्री. ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.218 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत पॉवरलुम ते विवेकानंद हायस्कुल या रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,96,969/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठीनिविदापत्रके मागविली असता 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | के.बी. पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा 27.21% जास्त दराने |
| 2 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 28% जास्त दराने |
| 3 | राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा 29% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री. के.बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 27.21% जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 12.55% जास्त दर येतात.

तरी श्री.के.बी.पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.55% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत पॉवरलुम ते विवेकानंद हायस्कुल या रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.55% जास्त दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.219 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.24,94,146/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झ ाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 26.21% जास्त दराने |
| 2 | रूपेंद्रसिंग जग्गी | अं.प.दरापेक्षा 28% जास्त दराने |
| 3 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 31% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री. ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 26.21% जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 12.81% जास्त दर येतात.

तरी श्री.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.81% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.81% जास्त दराची श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.220 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत एन-1 भागात रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,48,650/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 21.66% जास्त दराने |
| 2 | रूपेंद्रसिंग जग्गी | अं.प.दरापेक्षा 30% जास्त दराने |
| 3 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 31.31% जास्त दराने |
| 4 | एम. ए. सिद्योकी | अं.प.दरापेक्षा 35% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 21.66% जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 13.02% जास्त दर येतात.

तरी श्री.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.02% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत एन-1 भागात रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.02% जास्त दराची श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.221 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.13 विश्वासनगर येथील उध्दवराव पाटील चौक ते हनुमान मंदिर पर्यंतचा रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,90,500/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकूण 10 निविदा विक्री झाल्या 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | मे. रे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 24% जास्त दराने |
| 2 | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 30.6% जास्त दराने |
| 3 | एम. ए. सिद्योकी | अं.प.दरापेक्षा 33% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 4 | अरोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 35.66% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 24% जास्त दराची निविदा मे. रे कन्स्ट्रक्शन यांची असून सदर निविदेस 12.91% जास्त दराने वाटाघाटीअंती मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी मे. रे कन्स्ट्रक्शन यांची 12.91% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.13 विश्वासनगर येथील उध्दवराव पाटील चौक ते हनुमान मंदिर पर्यंतचा रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.91% जास्त दराची मे. रे कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.222 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पेठेनगर भावसिंगपुरा ते पडेगांव कत्तलखान्याकडे जाणाऱ्या उर्वरीत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.14,49,910/- चे असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकूण 6 निविदा विक्री झाल्या 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 28.56% जास्त दराने |
| 2 | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा 31% जास्त दराने |
| 3 | चारणीया कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 31.5% जास्त दराने |
| 4 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 31.75% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 28.56% जास्त दराची निविदा मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून सदर निविदेस 12.50% जास्त दराने वाटाघाटीअंती मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची 12.50% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पेठेनगर भावसिंगपुरा ते पडेगांव कत्तलखान्याकडे जाणाऱ्या उर्वरीत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्कदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.50% जास्त दराची मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.223 :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दि.13.10.2006 रोजी सर्वसाधारण सभेने ठराव क्र.531 नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांचे सेवेत असतांना अचानक दुःखद निधन झाल्यास ज्याप्रमाणे शासन घर बांधणी कर्जासाठी आकारण्यात आलेल्या व्याजास संपूर्णतः माफी देते, त्याच धर्तीवर वाहन कर्जावरील व्याज माफी देण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयाचा ठराव पारीत केलेला आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी श्री.एम.पी. खैरनार यांचे दि.24-7-2006 रोजी दुःखद निधन झाले असल्यामुळे आणि कै.एम.पी.खैरनार यांना महानगरपालिकेतर्फे चार चाकी वाहन खरेदीसाठी रू.2.00 लक्ष कर्ज वितरीत करण्यात आले होते, सदर कर्जावर 14% दराने व्याज रू.1,36,274/- असे एकूण 3,36,274/- पैकी रू.1,61,240/- इतकी रक्कम त्यांच्या मासिक वेतनातून वसूल करण्यात आली असून उर्वरीत मुद्दल रक्कम रू.38,760/- त्यांच्या सेवा निवृत्ती उपदानातून वसुल

करण्यात येईल. वाहन कर्जावरील व्याजाची संपूर्ण रक्कम सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या उपरोक्त ठरावातील धोरणात्मक निर्णयानुसार माफी देण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र.531, दि.13.10.2006 नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांचे सेवेत असतांना अचानक दु:खद निधन झाल्यास ज्याप्रमाणे शासन घर बांधणी कर्जासाठी आकारण्यात आलेल्या व्याजास संपूर्णतः माफी देते, त्याच धर्तीवर वाहन कर्जावरील व्याज माफी देण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयाचा ठराव पारीत झाल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी कै.श्री.एम.पी. खैरनार यांना महानगरपालिकेतर्फे चार चाकी वाहन खरेदीसाठी रू.2.00 लक्ष कर्ज वितरीत करण्यात आले होते, सदर कर्जावर 14% दराने झालेल्या रू.1,36,274/- व्याजास संपूर्णतः माफी देण्यास आणि उर्वरीत मुद्दल रक्कम रू.38,760/- त्यांच्या सेवा निवृत्ती उपदानातून वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.224 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.64 मध्ये झांबड इस्टेट येथील खुल्या जागेत बॅडमिंटन हॉल बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.12,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास स्थायी समितीने दि.14.9.2006 रोजी ठराव क्र.102 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/इ/निविदा/48/2006, दिनांक 7-10-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 14 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्या दिनांक 2.11.2006 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1 | अमित करवा | अं.प.दरापेक्षा 3.11% कमी दराने |
| 2 | काझी मुबारीज्जोद्यीन | अं.प.दरापेक्षा 4.89% जास्त दराने |
| 3 | अमन असोसिएटस् | अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने |
| 4 | एस. ए. नवाब | अं.प.दरापेक्षा 8% जास्त दराने |
| 5 | मे. जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 15% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 3.11% कमी दराची निविदा अमित करवा यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे. त्यानुसार अमित करवा यांची अं.प.दरापेक्षा 3.11% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.64 मध्ये झांबड इस्टेट येथील खुल्या जागेत बॅडमिंटन हॉल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 3.11% कमी दराची अमित करवा यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.225 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.26 मध्ये खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार र.रू.14,98,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2006-07 या

आर्थिक वर्षात विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,98,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.26 मध्ये खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या र.रू.14,98,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. मधुकर सावंत : बजेट मंजूर होते विकास कामाच्या संदर्भात बजेट बुक मध्ये नोंदी असतात संचिका तयार होतात. परंतू एक संचिका जवळपास ४५ ते ५० टेंबलवर जते. यात तीन चार महिन्याचा वेळ जतो.

मा. सभापती : महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. जी काही विकास कामाच्या संदर्भात सचिकांची प्रोसेस आहे ती कमीत कमी करण्याच्या दृष्टीने मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी.

श्री.साहेबराव कावडे : सन २००५-०६ या वर्षातील काही विकास कामे अद्याप झालेली नाहीत. चिकलठाणा भागात आंबेडकर चौक ते अहिल्याबाई होळकर चौकापर्यतचे काम अद्याप का झालेले नाही. संबधीत अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा.

उपअभियंता (स्लम) : सन २००५-०६ मधील जे काम होते ते मार्च अगोदर पूर्ण होणार आहे. सिमेंट कॉक्रीटचे काम चालू आहे १५ दिवसाच्या आत पूर्ण होणार आहे.आंबेडकर चौक ते अहिल्याबाई होळकर चौक पर्यतचे काम ८० टक्के झालेले आहे. राहिलेले काम १५ फेब्रुवारी पर्यत पूर्ण होतील.

श्री. साहेबराव कावडे : ५० टक्केच काम झालेले आहे. झालेल्या बांधकामावर पाणी टाकलेले नाही. त्यामुळे ते काम निष्कृष्ठ दर्जचे होत आहे.

मा. सभापती : त्वरीत कामे होतील यादृष्टीने संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद